# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# शनिवार दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६

## ठळक बातम्या

1. **भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या अंतरिम व्यापार कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरुप.**
2. **संत नगरी शेगाव इथं दिनांक २५ फेब्रुवारी रोजी, राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळाव्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उदघाटन.**
3. **ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी १० हजार ८३१ कोटींचे सामंजस्य करार.**
4. **गडचिरोली जिल्ह्यात केवळ ७ सशस्त्र नक्षली उरले असल्याची पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांची माहिती.**

**आता सविस्तर बातम्या .......**

व्यापार करार

भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या अंतरिम व्यापार कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरुप देण्यात आलं आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये ही माहिती दिली. या मसुद्यानुसार अमेरिकेत भारतीय वस्तूंवर लादलेलं आयात शुल्क कमी करुन ते १८ टक्क्यांपर्यंत कमी केलं जाईल, असं ते म्हणाले. यामुळे वस्त्रोद्योग आणि वस्त्रप्रावरणं, चामडं आणि पादत्राणं, प्लॅस्टिक आणि रबरापासून बनवलेल्या वस्तू, सेंद्रिय पदार्थ, गृह सजावट आणि हस्तशिल्प वस्तू या क्षेत्रांसाठी मोठी बाजारपेठ खुली होईल असा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला. याशिवाय जेनेरिक औषधं, रत्नं, हिरे आणि विमानाचे भाग यासह विविध श्रेणीतल्या वस्तूंवरचं शुल्क पूर्णपणे रद्द केलं

जाणार असल्यानं भारताच्या निर्यातीला आणि मेक इन इंडिया अभियानाला मोठी चालना मिळेल, तसंच हा करार कृषी आणि दुग्धजन्य उत्पादनांच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या हिताचं रक्षण करेल असं गोयल यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा

बुलढाणा जिल्ह्यात प्रथमच संत नगरी शेगाव येथे भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने येत्या 25 ते 28 फेब्रुवारी दरम्यान "राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्याचं उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती केंद्रीय (आयुष) राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज शेगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

***आपल्या देशाच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूजी या शेगाव येथे जे आपलं कार्यक्रम होत आहे. राष्ट्रीय जो कार्यक्रम होत आहे पंचवीस ते अठ्ठावीस फेब्रुवारी याच्या उद्घाटनाच्या निमित्ताने त्या येत आहेत. त्यांच्या सोबत आपले महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल येत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस साहेब आणि दोन्ही उपमुख्यमंत्री शिंदे साहेब आणि सुनित्राताई सुद्धा उद्घाटनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.***

आयुष मंत्रालयाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्याची जबाबदारी अखिल भारतीय आयुर्वेद महासंम्मेलनाला देण्यात आली आहे. अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन ही त्र्यंबकेश्वर येथे १९०७ साली स्थापन झालेली आयुर्वेदाची सर्वात मोठी आणि जुनी संघटना आहे. या राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये आयुष चिकित्सा पद्धतींचा म्हणजेच आयुर्वेद, युनानी, सिद्धा, सोवा-रिग्पा, होमिओपॅथी, निसर्गोपचार आणि योगाचा प्रचार प्रसार व्हावा या दृष्टीकोनातुन कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. दिनांक 25 ते 28 फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या या मेळाव्यात चारही दिवस नागरिकांची आणि रुग्णांची आरोग्य तपासणी, तसंच औषधोपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या आरोग्य मेळाव्यात देशभरातील आयुष, युनानी, होमिओपॅथी यासह आयुर्वेदिक चिकित्सक सहभागी होणार आहेत, अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ॲडव्हँटेज विदर्भ

महाराष्ट्र सध्या गतीशीलतेने विकसित होणारे राज्य आहे. त्यातल्या त्यात विदर्भाचा प्रदेश झपाट्याने विकसित होत आहे. महाराष्ट्रात सामंजस्य करार केवळ कागदावर होत नसून ते प्रत्यक्षात साकारताहेत,' अस प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटद्वारे आयोजित ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी इंटरनॅशनल बिझनेस कॉनक्लेव्हचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी तीन महत्त्वाचे सामंजस्य करार झालेत. यामध्ये पहिला करार महामेट्रो आणि केअर हॉस्पिटलमध्ये झाला. यात केअर हॉस्पिटलद्वारे १३१ कोटी इन्फ्रास्टक्चरसाठी आणि ५०० कोटी दवाखान्यासाठी गुंतविण्यात येणार आहेत. दुसरा करार गॅलक्सी सोलर कंपनीसोबत झाला. कंपनीद्वारे १० हजार कोटींची गुंतवणूक करत सोलर सेल, बॅटरी स्टोअरेज सिस्टीमची निर्मिती होईल. तिसरा करार टेलिकॉम टॉवरची निर्मिती करणाऱ्या जीआर इन्फ्रास्टक्चरसोबत झाला आहे. कंपनीने २०० कोटींची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्याचे आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी दिली.

जिल्हा परिषद निवडणूक

महाराष्ट्रात १२ जिल्ह्यांतल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी आज सकाळी साडेसात वाजता मतदानाला उत्साहात सुरुवात झाली. एकूण ७३१ जिल्हा परिषद जागांसाठी २ हजार ६२४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत, त्यापैकी ३६९ जागा महिलांसाठी, ८३ जागा अनुसूचित जातींसाठी, २५ जागा अनुसूचित जमातींसाठी आणि १९१ जागा इतर मागासवर्गीयांसाठी राखीव आहेत.

प्रकट दिन

बुलढाणा जिल्ह्यातील संत नगरी शेगाव येथे संत श्री गजानन महाराजांचा १४८व्या प्रकट दिन उत्सव साजरा होणार असल्याने राज्यातील विविध जिल्ह्यातून भाविकांच्या दिंड्या शेगावकडे मार्गस्थ होत आहेत. जालना, छत्रपती संभाजी नगर, अकोला, जळगाव, नाशिक, या जिल्ह्यातील अनेक भाविक पायदळ

वारीत राम नामाचा गजर करत भजनी दिंड्या शेगावकडे येत आहेत. दरम्यान उद्या ८ फेब्रुवारी रोजी संत गजानन महाराजांचा १४८ वा प्रकट दिन महोत्सव साजरा होणार असल्याने आज आणि उद्या २४ तास संत गजानन महाराज समाधी दर्शन खुलं करण्यात आलं आहे.

नक्षल बिमोड

छत्तीसगड आणि भामरागड तालुक्याच्या सीमावर्ती भागात झालेल्या चकमकीत पोलिसांनी नक्षल्यांच्या कंपनी क्रमांक १० चा म्होरक्या प्रभाकर याच्यासह ७ जहाल नक्षल्यांना ठार केल्यानंतर आता जिल्ह्यात केवळ ७ नक्षली शिल्लक राहिले असून, ३१ मार्चपर्यंत नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्यात येईल, असं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. तीन दिवस आणि तीन रात्र पोलिसांनी नक्षल्यांशी धैर्याने तोंड दिले. त्यात ७ नक्षली ठार झाले असून, सर्वांची ओळख पटली आहे. दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी तथा कंपनी क्रमांक १० चा कमांडर प्रभाकर आणि कपंनी क्रमांक ५ चा कमांडर पागू मोड्याम या दोन मोठ्या कॅडरचा त्यात समावेश आहे. या सर्वांवर दोनशे गुन्हे दाखल असून, महाराष्ट्र शासनाने एकूण ७१ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. आता गडचिरोली जिल्ह्यात केवळ ७ सशस्त्र नक्षली शिल्लक असून, त्यात गडचिरोली जिल्ह्यात राहणारे दोन आणि छत्तीसड राज्यात वास्तव्य करणाऱ्या ५ कॅडरचा समावेश आहे. त्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण करावे; अन्यथा ३१ मार्चपर्यंत त्यांचाही बीमोड करु, असा इशारा पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेला पोलिस उपमहानिरीक्षक अंकित गोयल, केंद्रीय राखीव दलाचे उपमहानिरीक्षक अजयकुमार शर्मा, अपर पोलिस अधीक्षक एम.रमेश, गोकुल राज जी उपस्थित होते.

पारितोषिक

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण पुणे यांचेकडून राज्यस्तरीय पारितोषिकाची घोषणा करण्यात आली आहे. विद्यापीठ गटामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना सलग तिसऱ्या वर्षी प्रथम पारितोषिक मिळाले आहे. या पुरस्कारांच्या माध्यमातून उद्योग, संस्था, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था तसेच इमारती येथे ऊर्जेचा कार्यक्षम वापर, व्यवस्थापन आणि ऊर्जा संवर्धनाच्या उपक्रमांना

गौरविण्यात येते. या पुरस्कारांचा उद्देश राज्यभर ऊर्जा कार्यक्षमतेचा प्रसार करणे तसेच शाश्वत आणि पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे.

पोहरादेवी

येत्या १५ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या श्री संत सेवालाल महाराज जन्मोत्सवाच्या अनुषंगाने पोहरादेवी येथे होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांच्या नियोजन आणि व्यवस्थापनाबाबत मंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पोहरादेवी येथील नंगारा भवन येथे आढावा बैठक आज घेण्यात आली. हा जन्मोत्सव लाखो भाविकांच्या श्रद्धेचा विषय आहे. या पार्श्वभूमीवर जन्मोत्सव काळात भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी योग्य नियोजन आणि परस्पर समन्वय राखून आपापली जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश मंत्री संजय राठोड यांनी दिले. यावेळी त्यांनी कार्यक्रम स्थळास प्रत्यक्ष भेट देऊन नियोजन, सुविधा आणि आवश्यक तयारीचा सविस्तर आढावा घेतला. त्याचप्रमाणे भगवान मुंगसाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त दारव्हा तालुक्यातील श्री क्षेत्र धामणगाव (देव) येथे दिनांक २३ आणि २४ फेब्रुवारी रोजी महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. या नियोजनासंदर्भात देखील पालकमंत्री राठोड यांनी यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेवून भाविकांच्या सुविधेसाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

टी ट्वेंटी विश्वचषक

क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात झाली. आजच्या पहिल्या सामन्यात कोलंबो इथं पाकिस्तानने नेदरलँडसवर ३ गडी राखून विजय मिळवला. आजचा दुसरा सामना वेस्ट इंडिज विरुद्ध स्कॉटलँड यांच्यात कोलकाता इथं सुरु आहे. तिसऱ्या सामन्यात भारत आणि अमेरिका आमनेसामने असतील. हा सामना मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

## अंडर १९ क्रिकेट

बीसीसीआय अर्थात भारत क्रिकेट नियामक मंडळाने १९ वर्षांखालील भारतीय पुरुष क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघाला साडेसात कोटी रुपयांचं बक्षिस जाहीर केलं आहे. काल हरारे इथल्या हरारे स्पोर्ट्स क्लबमध्ये झालेल्या आयसीसी १९ वर्षांखालील पुरुष क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडचा १०० धावांनी पराभव करून सहाव्यांदा विश्वचषक विजेतेपद पटकावलं.

*****